# मुकुल माधव फाउंडेशनच्या साथीने 'विश्वास'चे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण

**मुंबई :** आयुष्याच्या नव्या टप्प्याला सामोरे जाण्याचे स्वप्न बघणारा विश्वास शिंदे हा एक हुशार विद्यार्थी. दुर्दैवाने नववीत असताना विश्वासला मम्प्स अॅटॅकचा सामना करावा लागला. यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले.

बेताची आर्थिक परिस्थिती आणि बहिरेपणाचे अनपेक्षित संकट, या सत्याचा धीराने सामना करत विश्वासने दहावीची परीक्षा ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. शारीरिक अडचणींचा सामना करतच उच्च शिक्षणाचा प्रवास सुरू केलेल्या विश्वासाच्या स्वप्नांवर मुकुल माधव फाउंडेशनने विश्वास ठेवला. फक्त शारीरिक अडणीवर मात करण्यापुरते नाही तर उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यातही मुकुल माधव फाउंडेशनने विश्वासला साथ दिली.